# प्रेसनोट दि. ११/०८/२०१९

## सिंहगड रोड परिसारातुन दुचाकी चोरी करणाऱ्या महिलेस युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांचेकडून जेरबंद

-----ooo----------ooo----------ooo----------ooo-----

दि. १०/०८/२०१९ रोजी युनिट -१, गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील अधिकारी व कर्मचारी युनिट-१ हद्दीमध्ये वाहन चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्याचे दृष्टीने शासकीय वाहनाने पेट्रोलींग करीत असताना पोहवा अजय थोरात यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, जगताप हॉस्पीटल सिंहगड रोड येथून दुचाकी चोरी करणारी संशयीत महिला ही तिचे रहाते घरी आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्या बाबत वरिष्ठांना माहिती देवुन वरिष्ठांचे परवानगीने युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर पथकाकडील स्टाफ़सह बातमी प्रमाणे जावुन नमुद संशयीत महिलेस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता तिने तिचे नाव मुग्धा अभयकुमार कोडीलीकर, वय २० वर्षे, रा. श्रीविहार सोसायटी, रो हाऊस नं. ४, ज्ञानदीप शाळेजवळ, नऱ्हेगांव, पुणे असे असल्याचे सांगितले. तिच्याकडे विचारपुस करता तिने सुमारे दोन महिन्यापुर्वी जगताप हॉस्पीटल, सिंहगड रोड येथून डीओ दुचाकी चोरले बाबत सांगून ती दुचाकी स्वतः वापरत असल्याचे सांगितले. सदरची २५,०००/- रु किंमतीची होंडा कंपनीची डिओ़ मोटार सायकल तिच्याकडुन जप्त करुन पुढील कारवाई कामी सदर आरोपी मुददेमालासह सिंहगड रोड पोलीस स्टेशन यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री बच्चन सिंग, यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. गजानन पवार, पोलीस कर्मचारी अजय थोरात, अमोल पवार, वैभव स्वामी, अनिल घाडगे, महिला पोलीस कर्मचारी आरती कांबळे यांनी केली आहे.